# नवीन फ्लिपकार्ट हेल्थ+ ॲपसोबत फ्लिपकार्टचा आरोग्यसेवा क्षेत्रात प्रवेश

- भारतभरातील २०,००० पेक्षा अधिक पिनकोड्सवरील ग्राहकांना दर्जेदार आणि परवडणाऱ्या दरातील औषधे आणि आरोग्यसेवा उत्पादने देण्यासाठी आणि 'स्वस्थ भारत'योजनेत योगदान देण्याचे ध्येय

- आरोग्यसेवेच्या पूर्ण न झालेल्या गरजा पूर्ण करण्यासाठी चांगली औषधे आणि आरोग्यसेवा उत्पादनांच्या सहजसाध्यतेची दरी भरून काढून आरोग्यसेवा वातावरणात भागीदारी आणि मजबूतीकरणाचे उद्दिष्ट

**बंगळुरू, ६ एप्रिल २०२२**: फ्लिपकार्ट हेल्थ+ या भारताच्या देशांतर्गत फ्लिपकार्ट समूहाच्या डिजिटल आरोग्यसेवा मार्केटप्लेस प्लॅटफॉर्मने आज फ्लिपकार्ट हेल्थ+ ॲपच्या अनावरणाची घोषणा केली असून या तंत्रज्ञान व्यासपीठाद्वारे देशभरातील लाखो ग्राहकांना चांगली औषधे आणि आरोग्यसेवा उत्पादने तसेच सेवा देणे शक्य होऊ शकेल. भारतातील सुमारे २०,००० पिनकोड्सवरील ग्राहकांना सेवा देण्याच्या हेतूने सुरू केलेल्या फ्लिपकार्ट हेल्थ+ मधून फ्लिपकार्ट हेल्थ+ ॲपच्या माध्यमातून दर्जेदार आणि परवडणाऱ्या दरातील औषधे आणि आरोग्यसेवा उत्पादने स्वतंत्र विक्रेत्यांकडून सहजपणे आणि सुलभ पद्धतीने दिली जातील.

फ्लिपकार्ट हेल्थ+ ला फ्लिपकार्ट ग्रुपची पोहोच आणि शेवटच्या टप्प्यातील पुरवठा साखळीतील ज्ञान आणि अनुभवाचा तसेच सस्तासुंदर.कॉमच्या देशभरातील उत्तम आरोग्यसेवा नेटवर्कचा फायदा मिळेल. त्यांचे ध्येय विविध प्रकारची औषधे आणि आरोग्यसेवा उत्पादने तसेच सेवा यांचा परवडणाऱ्या दरातील ॲक्सेस देऊन भारताच्या आरोग्यसेवा वातावरणाचे मजबूतीकरण करण्याचे आहे आणि त्याचवेळी दीर्घकालीन शाश्वत आरोग्य आणि सामाजिक विकास यांच्या संदर्भात आरोग्यसेवा क्षेत्राशी भागीदारी करण्याचेही आहे.

फ्लिपकार्ट हेल्थ+ ॲपच्या अनावरणाबाबत बोलताना **फ्लिपकार्ट हेल्थ+चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. प्रशांत झवेरी** म्हणाले की, "कोविड-१९ ची जागतिक साथ आल्यापासून वेलनेस आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेसाठी भारतीयांनी मोठी पसंती दिली आहे आणि आरोग्य आणि वेलनेसवर अभूतपूर्व पद्धतीने लक्ष केंद्रित केले आहे. फ्लिपकार्ट हेल्थ+ द्वारे आम्ही चांगल्या औषधांची तसेच हेल्थकेअर उत्पादनांची देशभरातील सहजसाध्यतेची दरी सांधण्यासाठी आणि विशेषतः आतापर्यंत सेवा न दिलेल्या भारतातील सर्वांत दुर्गम भागांमध्ये पोहोचण्यासाठी प्रयत्नशील आहोत. आम्हाला तंत्रज्ञानाचा अशा प्रकारे वापर करायचा आहे की, त्यामुळे आरोग्यसेवा वातावरणाचे मजबूतीकरण होईल आणि देशाच्या अत्यंत दुर्गम ठिकाणी राहणाऱ्या लोकांसाठीही आरोग्यसेवा सहजपणे उपलब्ध होऊ शकेल. त्यामुळे सुदृढ भारताच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकले जाईल."

फ्लिपकार्ट हेल्थ+ ॲपची रचना युजर फ्रेंडली इंटरफेससोबत केली असून त्यामुळे ग्राहकांचे तांत्रिक ज्ञान कितीही कमी असले तरी त्यांना तो वापरता येईल. उत्तम तंत्रज्ञान आणि लॉजिस्टिक पायाभूत सुविधांसोबत फ्लिपकार्ट हेल्थ+ नियामकांच्या आराखड्यानुसार विविध आरोग्यसेवा स्थितींसाठी औषधे आणि आरोग्यसेवा उत्पादने तसेच सेवा देईल. त्यात गंभीर व मोठे आजारांचा समावेश असेल आणि भारतभरातील तसेच विशेषतः पूर्वापार सेवा न दिल्या गेलेल्या दुर्गम ठिकाणच्या जास्तीत जास्त ग्राहकांपर्यंत या सेवा पोहोचू शकतील.

सुरूवातीला फ्लिपकार्ट हेल्थ+ प्लॅटफॉर्मकडे सुमारे ५०० हून अधिक स्वतंत्र विक्रेते असतील. त्यांच्याकडे मेडिकल प्रिस्क्रिप्शनच्या तपासणीसाठी आणि औषधे अचूकपणे देण्यासाठी नोंदणीकृत फार्मसिस्ट असतील. हा एक मध्यस्थ मार्केटप्लेस प्लॅटफॉर्म असला तरी फ्लिपकार्ट हेल्थ+ ने विविध दर्जा तपासणी आणि पडताळणी प्रोटोकॉल्स आणले आहेत. ते स्वतंत्र पुरवठादारांकडून ग्राहकांच्या दारापर्यंत चांगल्या दर्जाची औषधे आणि आरोग्यसेवा उत्पादने पोहोचवण्याची सुविधा देतील. आगामी काही महिन्यांमध्ये फ्लिपकार्ट हेल्थ+ चे ध्येय तृतीय पक्ष आरोग्यसेवा पुरवठादारांना सेवेत घेण्याचे आहे. ते इतर मूल्याधारित आरोग्यसेवा सुविधा जसे टेलिकंस्ट्रक्शन आणि इ-डायग्नोस्टिक्स ग्राहकांना देतील.

आरोग्यसेवा हे महसूल आणि रोजगार या संदर्भातील भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वांत मोठ्या क्षेत्रांपैकी एक बनले आहे. भारतातील डिजिटल साधनांच्या वापरातील वाढ ही देशभरात विविध प्रकारची औषधे आणि आरोग्यसेवा उत्पादने उपलब्ध करण्याची एक संधी आहे.

सुरूवातीला अँड्रॉइड प्ले स्टोअरवर उपलब्ध असलेला आणि भविष्यात आयओएसवर उपलब्ध होणारा फ्लिपकार्ट हेल्थ+ अॅप कमी बँडविड्थमध्येही पाहता येतो. त्यामुळे तो देशभरातील ग्राहकांना सहजसाध्य होईल.

**About Flipkart Health+**

Flipkart Health+ is the digital healthcare marketplace platform that is a part of the Flipkart Group - India’s homegrown consumer internet ecosystem. Flipkart Health+ aims to provide millions of customers across the country access to quality and affordable healthcare through genuine medicines and healthcare products delivered to them. Flipkart Group acquired a majority stake in SastaSundar.com marketplace platform in 2021 to synergise its in-depth expertise to enable customers with high-quality medicines and healthcare products and services in the health-tech ecosystem through Flipkart Health+. The platform would benefit from the experience and expertise of the Flipkart Group, which includes its pan-India reach and technology capabilities, along with SastaSundar.com’s in-depth expertise to provide customers with an array of genuine offerings in the health-tech ecosystem.


**For more information, please contact media@flipkart.com**

**For media queries, please contact Ruder Finn –**

| | |
|---|---|
| Swati Chauhan<br>chauhans@ruderfinnasia.com / 8505947705 | Medha Banerjee<br>banerjeem@RuderFinnAsia.com / 9874393817 |